Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२६६६७३७६

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**मुंबई पोलीस**

पुण्यश्लोक ३००

पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८.

अधिसूचना क्रमांक - ५७८ /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – ३१/०३/२०२६

## तात्पुरती अधिसूचना / आदेश

अधिसूचना क्रमांक - ५८७ /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक - ३१/०३/२०२६

ज्या अर्थी, वाकोला वाहतूक विभागाच्या हद्दीमध्ये दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी हनुमान जन्मोत्सवानिमित्त धार्मिक मिरवणूक आयोजित करण्यात आलेली असून सदर मिरवणुकीमध्ये अंदाजे ८,००० ते १०,००० इतका मोठा जनसमुदाय सहभागी होणार आहे. सदर मिरवणूक हनुमान मंदिर, वाकोला येथून सुरू होऊन वाकोला जंक्शन मार्गे पंडित जवाहरलाल नेहरू रोड – व्ही. एन. देसाई रुग्णालय – गोळीबार चौकी – गोळीबार रोड – अब्दुल हकीम चौक येथून यू-टर्न घेऊन सांताक्रुज रेल्वे स्टेशन मार्गे पुन्हा हनुमान मंदिर, वाकोला येथे समाप्त होणार आहे.

ज्या अर्थी, गोळीबार रोड हा अत्यंत अरुंद रस्ता असून सदर रस्त्यावर दोन्ही बाजूस रस्त्याचे काम सुरू आहे तसेच मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होणार असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, अजित बोऱ्हाडे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पश्चिम उपनगर, मुंबई, मला मोटार वाहन अधिनियम, १९८८ (नियम ५९, मोटार वाहन नियम, १९८९) कलम ११५ तसेच शासन निर्णय क्र. MVA ०५८९/CR-१०६१/TR-२ दि. १९/०५/१९८९, MGG IV-A दि. २०/०९/१९९० आणि MVA ००१९६/८७१/CR-३७/CR-२ दि. २७/०९/१९९६, MGG I-V-A Ex-P ३०७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांनुसार खालीलप्रमाणे तात्पुरते वाहतूक निर्बंध लागू करीत आहे.

**वाहतूक निर्बंध**

१. वाकोला वाहतूक विभागाच्या हद्दीतील वाकोला जंक्शन - सांताक्रुझ पूर्व रेल्वे स्टेशन - खार सबवे, सांताक्रुज (पूर्व), मुंबई हा मार्ग दिनांक ०२/०४/२०२६ रोजी सायंकाळी १८.०० ते २२.०० वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी पूर्णतः बंद राहील.
२. सदर कालावधीत खार सबवे मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी पर्यायी मार्ग म्हणून मिलन सबवे अथवा मिलन उड्डाणपुलाचा वापर करावा.

ही अधिसूचना माझ्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दि. ३१/०३/२०२६ रोजी मुंबई येथे जारी करण्यात येत आहे.

पोलीस उप आयुक्त वाहतूक, पश्चिम उपनगरे, मुंबई
सत्यमेव जयते

(अजित बोऱ्हाडे)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)
मुंबई शहर

Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
Phone Number – 022-26667376

Govt. of Maharashtra
Home Department
**Mumbai Police**

**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**
Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road, Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098

**Outward No. 514 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 31/03/2026**

## TEMPORARY NOTIFICATION / ORDER

**Notification No. 87 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 31 /03/2026**

Whereas, within the jurisdiction of Vakola Traffic Division, a religious procession has been organized on **02 April 2026** on the occasion of **Hanuman Janmotsav**, in which approximately **8,000 to 10,000 devotees** are expected to participate. The said procession will commence from **Hanuman Temple, Vakola** and proceed via **Vakola Junction – Pandit Jawaharlal Nehru Road – V. N. Desai Hospital – Golibar Chowki – Golibar Road – Abdul Hakim Chowk**, from where it will take a U-turn and return via **Santacruz Railway Station** to **Hanuman Temple, Vakola**, where it will conclude.

Whereas, **Golibar Road** is a very narrow road and road work is in progress on both sides of the road, and during the procession a large gathering of devotees is expected on both sides of the road; therefore, in order to maintain smooth traffic flow, it is necessary to divert traffic through alternative routes.

Now, therefore, I, **Ajit Borhade, Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs), Mumbai**, in exercise of the powers vested in me under **Section 115 of the Motor Vehicles Act, 1988 read with Rule 59 of the Central Motor Vehicles Rules, 1989**, and in accordance with Government Resolutions No. **MVA 0589/CR-1061/TR-2 dated 19/05/1989, MGG IV-A dated 20/09/1990, and MVA 00196/871/CR-37/CR-2 dated 27/09/1996, MGG I-V-A Ex-P 307**, hereby impose the following temporary traffic restrictions:

### Traffic Restrictions

1. The road stretch **Vakola Junction – Santacruz East Railway Station – Khar Subway, Santacruz (East), Mumbai**, within the jurisdiction of Vakola Traffic Division, shall remain **closed to all types of vehicular traffic** on **02/04/2026 from 18:00 hrs to 22:00 hrs.**

2. During the said period, motorists traveling via **Khar Subway** are advised to use **Milan Subway or Milan Flyover** as alternate routes.

This notification is issued under my seal and signature on this **31st day of March, 2026 at Mumbai.**

DEPUTY COMMISSIONER OF POLICE, TRAFFIC, WESTERN SUBURBAN, MUMBAI

**(Ajit Borhade)**
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City

Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२६६६७३७६

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**मुंबई पोलीस**

पुण्यश्लोक ३००

पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८.

जा क्र - ५१४ /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६,    दिनांक – ३१/०३/२०२६

## वृत्तपत्र सूचना

### मुंबई पोलीस – वाहतूक विभाग, पश्चिम उपनगर

वाकोला वाहतूक विभागाच्या हद्दीमध्ये दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी हनुमान जन्मोत्सवानिमित्त धार्मिक मिरवणूक आयोजित करण्यात आलेली आहे. सदर मिरवणुकीमध्ये अंदाजे ८,००० ते १०,००० इतका मोठा जनसमुदाय सहभागी होणार आहे. सदर मिरवणूक हनुमान मंदिर, वाकोला येथून सुरू होऊन वाकोला जंक्शन मार्गे पंडित जवाहरलाल नेहरू रोड – व्ही. एन. देसाई रुग्णालय – गोळीबार चौकी – गोळीवार रोड – अब्दुल हकीम चौक येथून यू-टर्न घेऊन सांताक्रुज रेल्वे स्टेशन मार्गे पुन्हा हनुमान मंदिर, वाकोला येथे समाप्त होणार आहे.

गोळीवार रोड हा अत्यंत अरुंद रस्ता असून सदर ठिकाणी रस्त्याचे काम सुरू आहे तसेच मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होणार असल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दिनांक **०२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी १८.०० ते २२.०० वाजेपर्यंत वाकोला जंक्शन – सांताक्रुज पूर्व रेल्वे स्टेशन – खार सबवे हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहील.**

या कालावधीत खार सबवे मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी पर्यायी मार्ग म्हणून मिलन सबवे अथवा मिलन उड्डाणपुलाचा वापर करावा. वाहनचालकांनी वाहतूक पोलीसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस उप आयुक्त वाहतूक, पश्चिम उपनगरे, मुंबई
सत्यमेव जयते

(अजित बोऱ्हाडे)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)
मुंबई शहर

Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in
Phone Number –022-26667376

सत्यमेव जयते
Govt. of Maharashtra
Home Department
**Mumbai Police**

**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**
Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road, Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098

Outward No. 514/DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 31/03/2026

## PRESS RELEASE

### (Mumbai Traffic Police – Western Suburbs Division)

A religious procession has been organized within the jurisdiction of Vakola Traffic Division on 02 April 2026 on the occasion of Hanuman Janmotsav. Approximately 8,000 to 10,000 devotees are expected to participate in the procession. The procession will start from Hanuman Temple, Vakola and proceed via Vakola Junction – Pandit Jawaharlal Nehru Road – V. N. Desai Hospital – Golibar Chowki – Golibar Road – Abdul Hakim Chowk, and will return via Santacruz Railway Station to Hanuman Temple, Vakola.

Golibar Road is a very narrow road and road work is in progress at the location. Considering the large crowd expected during the procession and to avoid traffic congestion, the road stretch from **Vakola Junction – Santacruz East Railway Station – Khar Subway will remain closed to all types of vehicular traffic on 02 April 2026 from 18:00 hrs to 22:00 hrs.**

Motorists traveling via Khar Subway are advised to use Milan Subway or Milan Flyover as alternate routes. Citizens are requested to cooperate with the Traffic Police and follow traffic instructions.

DEPUTY COMMISSIONER OF POLICE, TRAFFIC, WESTERN SUBURBAN, MUMBAI
सत्यमेव जयते

**(Ajit Borhade)**
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City